# रायगडला चालना देण्यासाठी शहर विकास; एमएमआरच्या स्थावर मालमत्तेच्या सीमेवरील उगवता तारा: क्रेडाई एमसीएचआय रायगड – जेएलएल अहवाल

- क्रेडाई एमसीएचआय रायगडच्या अध्यक्षपदाची सूत्रे श्री. अतीक खोत यांनी हाती घेतली
- जिल्ह्यात निवासी आणि कार्यालयीन प्रकल्पांना चालना मिळावी यासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचे प्रकल्प
- स्टँडर्ड आणि परवडणा-या अशा दोन्ही प्रकारच्या गृह प्रकल्पांत सर्वात जास्त १ बीएचकेचा पुरवठा आणि मागणी
- सब डॉलर ऑफिस रेंटलमुळे आयटी-आयटीईएस किफायतशीर बाजारपेठा

**मुंबई, ७ सप्टेंबर २०१८:** कॉन्फिडरेशन ऑफ रियल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया **(CREDAI - क्रेडाई) एमसीएचआय रायगड** युनिटतर्फे 'चेंज ऑफ गार्ड' समारोहाचे आयोजन करण्यात आले. या समारोहामध्ये श्री. अतीक खोत यांच्याकडे माननीय अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पीसीएमसी कमिशनर श्री. गणेश देशमुख यांनी उपस्थिती दाखवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. **क्रेडाई एमसीएचआयतर्फे ``रायगड जिल्हा: एमएमआरच्या अख्यातरीत नवीन विकसित होणारा दक्षिणी प्रदेश''** असा अहवाल सादर करण्यात आला आहे, हा अहवाल भारतातील रियल इस्टेट सेवांमधील जेएलएल या सर्वात मोठ्या फर्मसह सादर करण्यात आला आहे. या अहवालात जिल्ह्याची एकूण माहिती, विकासासाठीची एकत्रित करता येण्याजोगी आकर्षक ठिकाणे अशा प्रमुख घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

## मालमत्ता वर्गात सुधारणा:

**अधिवासी**: रायगड जिल्ह्यातील खारघर ,पनवेल ,तळोजे ,रसायनी ,कळंबोली ,द्रोणागिरी आणि उलवे आदी ठिकाणी निवासी विकास होत आहे .नवी मुंबईच्या तुलनेत या ठिकाणी अधिक परवडणा-या किंमतीत घरे उपलब्ध आहेत ,शिवाय येथे वाहतुकीसाठी योग्य साधने आहेत. तसेच ही ठिकाणे चांगली कनेक्टिव्हिटी आणि गुंतवलेल्या पैशांचे योग्य परतावे देणारी आहेत .जिल्ह्यात साधारण ५,००० ते ७,००० रुपये प्रति स्क्वेअर फूट असा दर असून ,नवी मुंबईत १०,००० रुपये स्क्वेअर फूट असा दर सुरू आहे .

**व्यावसायिक** : ठाणे आणि नवी मुंबईच्या बाजारपेठांमध्ये भाडेतत्त्वावरील जागेसाठी प्रति महिना 50ते 60 रुपये प्रति स्क्वेअर फुटांचा दर आहे ,हा दर आयटी-आयटीईएस क्षेत्रातील सब-डॉलर रेंटल दरांप्रमाणे आहे . मुंबईतील सब-डॉलर अ श्रेणीतील बाजारपेठांद्वारे शहरात पहिल्यांदाच अशी संधी दिली आहे ,ज्यांना कमीत कमी दरात मोठी जागा हवी अशा अशा भाडेकरूंसाठी ही संधी दिली जात आहे .आयटी-आयटीईएस क्षेत्र भारतीय व्यावसायिक रियल्टी व्यवसायासाठी अतिशय महत्त्वाचे आहे आणि या क्षेत्रातील वार्षिक भाडेतत्त्वाची उलाढाल ४० टक्क्यांवर बंद होते .

**औद्योगिक** : रायगड जिल्ह्यात ३,६१४ युनिट्सची नोंद झाली आहे .गेल्या चार वर्षांत इतक्या जलद गतीने या युनिट्सची वाढ झाली आहे .या औद्योगिक युनिट्समध्ये संक्षिप्त ,लहान ,मध्यम आणि मोठ्या प्रमाणातील एंटरप्रायजेसचा समावेश आहे आणि अधिकृत क्षेत्रात ८९,००० लोकांना रोजगाराच्या एकत्रित

संधी उपलब्ध करून दिल्या जातात .गेल्या चार वर्षांमध्ये एकूण रोजगार ८६,५११वरून ८९,१३७ इतका वाढला आहे .

क्रेडाई एमसीएचआयचे अध्यक्ष श्री .नयन शाह म्हणाले की ,``क्रेडाई एमसीएचआय ,रायग डच्या अध्यक्षपदाची धुरा घेतल्याबद्दल मी श्री .अतीक खोत यांचे अभिनंदन करतो .ही एक मोठी जबाबदारी आहेच ,शिवाय तो एक सन्मान आहे आणि श्री .खोत यांचे नेतृत्त्व व रियल इस्टेटमधील विकासासाठीची वचनबद्धता पाहता क्रेडाई रायगडचे भविष्य उज्ज्वल आहे .क्रेडाई एमसीएचआय-जेएलएल अहवालात मांडल्यानुसार ,रायगड परवडणा-या घरांसाठी एक उत्तम उपनगर ठरणार आहे आणि हे राज्यातील सर्वात उत्तम उदाहरण असेल .याबरोबरच प्रस्तावित पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या परिणामांमुळे रायगड प्रदेशात विक्रीला चालना मिळणार असल्याचेही ,या अहवालात नमूद करण्यात आले आहे."

क्रेडाई एमसीएचआय ,रायगडचे अध्यक्ष श्री .अतीक खोत म्हणाले की ,``क्रेडाई एमसीएचआय ,रायगडच्या नव्या प्रगती व विकासाच्या युगाचे नेतृत्त्व करण्यासाठी मी अतिशय उत्सुक आणि रोमांचित आहे . भारतातील संपूर्ण नव्या रियल इस्टेट क्षेत्रात या नवीन शाश्वत विकासाला सुरुवात झाली आहे आणि आता रायगडही या अविरत गतीमध्ये योगदान देत आहे .या कार्यक्रमात क्रेडाई एमसीएचआय-जेएलएलच्या अहवालात ,रियल इस्टेटमधील क्षमतांवर आणि रायगडच्या आर्थिक विकासावर प्रकाश टाकण्यात आला आहे."

जेएलएलचे सीईओ आणि कंट्री हेड रमेश नायर म्हणाले की ,``भारतीय शहरांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी जलद गतीने शहरीकरण होणे देखील गरज आहे ,स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून या संबंधित भागांमध्ये सर्वोत्तम विकास होणार आहे .रायगड विकासासाठी सर्वोत्तम आणि धोरणात्मकरीत्या योग्य ठिकाण आहे .शहरापासून जवळच्या अंतरावर असलेल्या नगरांमध्ये मुंबई आणि मेट्रोपॉलिटन प्रदेशांच्या तुलनेत अधिक चांगली जीवनशैली मिळू शकते."

| रायगडभोवतालच्या प्रदेशातील प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्प | सुरू असलेले | येणारे |
|---|---|---|
| रस्ते | सायन-पनवेल हायवे, ठाणे – बेलापूर रोड | मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, विरार-अलिबाग मल्टी मोडल कॉरिडोअर |
| रेल्वे नेटवर्क | ठाणे- पनवेल लाइन, वसई-दिवा-पनवेल लाइन, पनवेल-पेण लाइन आणि पनवेल-रोहा लाइन | पनवेल-रोहा लाइन ट्रक डबलिंग, पनवेलमध्ये पॅसेंजर ट्रेन टर्मिनल |
| अन्य प्रमुख विकासकामे | लागू नाही | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जेएनपीटी विस्तार |
| रस्ते | सायन-पनवेल हायवे, ठाणे – | मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, विरार- |

| | | |
|---|---|---|
| | बेलापूर रोड | अलिबाग मल्टी मोडल कॉरिडोअर |

रायगड अद्याप प्रारंभावस्थेत आहे आणि पायाभूत सुविधा व शहरी विकासाच्या योजना देत आहे , रायगडमध्ये महत्त्वपूर्ण सुविधांच्या अपेक्षा आपण करू शकतो .महारेरा (MahaRERA) नुसार ,येथे बांधकाम सुरू असलेले १० ऑफिसांचे सक्रिय प्रकल्प सुरू आहेत ,काही पूर्ण झाले आहेत ,नजीकच्या भविष्यात येथे ३.५ ते ४ लाख स्क्वेअर फुटांची ऑफिससाठीची जागा मिळू शकते आणि येथे अधिवासी प्रकल्पांनाही चालना मिळू शकते.

समाप्त

**<u>क्रेडाई एमसीएचआयबद्दल</u>**

क्रेडाई एमसीएचआयबद्दल रायगड ही उद्योगक्षेत्रातील एक बळकट संस्था आहे. या संस्थेद्वारे रायगडमधील प्रमुख रियल इस्टेट विकसकांना, जिल्ह्यातील घरांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी एकत्रित आणण्यात आले आहे. या संस्थेद्वारे प्रशासनाच्या सर्व स्तरांवरील निर्णय घेणाऱ्या प्राधिकरणाकडे, विविध विषयांवरील आणि महत्त्वाची मते मांडली जातात. आजघडीला क्रेडाई-एमसीएचआय रायगड ही या जिल्ह्यातील एक मानाची, रिअल इस्टेट डेव्हलपर्सची संस्था आहे आणि या भागातील  बहुतांश संघटित विकासक या संस्थेचे सदस्य आहेत.

क्रेडाई एमसीएचआय, रायगडने 2013 साली सुरुवात केली होती, आजच्या घडीला ही संस्था म्हणजे बळकट आणि स्थिर स्वरुपाची या क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणारी सगळयात सर्वात महत्त्वाची संस्था आहे. केंद्र आणि राज्य प्रशासनाकडून मान्यता मिळालेले हे मंडळ उत्तम आघाडीच्या कामांसाठीचे उदाहरण आहे, उद्योगक्षेत्रावर सर्वात जास्त परिणामकारक ठरणाऱ्या घटकांबद्दल मंडळाकडून चर्चा केली जाते. क्रेडाई एमसीएचआय, रायगड नेहमीच आपले सदस्य आणि समाजाला मोठ्या प्रमाणावर सर्वोत्तम सेवा देण्यासाठी प्रयत्नशील असते, इतकेच नाही तर रियल इस्टेट आणि गृह क्षेत्राचा विकास होईल याची खात्री देते, या विकासामुळे साहजिकच नागरिकांचे जीवनमान उंचावते आणि भारताच्या एकूण विकासाला त्यांचे योगदान लाभते.

सुयोग्य दृष्टिकोनासह आम्ही सर्वोत्तम ते सर्वकाही करतो, क्रेडाई एमसीएचआय, रायगड ही विविध हेतूंसाठी कार्यरत असणारी संस्था आहे. ही संस्था म्हणजे केवळ विकासकांसाठीचाच आवाज नाही, तर इतर भागधारकांनाही रियल इस्टेट उद्योगक्षेत्रासह गुंतवणारी संस्था आहे.

**<u>जेएलएल इंडियाबद्दल</u>**

जेएलएल ही भारतातील रियल इस्टेटमधील प्रमुख आणि सर्वात मोठी व्यावसायिक सेवांची विशेष संस्था आहे. तिचा आर्थिक वर्ष २०१७-१८ चा अलेखापरिक्षित महसूल ३४०० कोटी रुपये होता. गेल्या २० वर्षांमध्ये या फर्मने भरीव काम करून सक्षमपणे विकास साधला आहे. जेएलएल इंडिया तब्बल १०

शहरांमध्ये (अहमदाबाद, दिल्ली, मुंबई, बंगळुरु, पुणे, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, कोची आणि कोईम्बतूर) कार्यरत आहे आणि तिच्याकडे १०००० पेक्षा जास्त कर्मचारी वर्ग आहे. फर्मद्वारे गुंतवणूकदार, विकसक, स्थानिक कॉर्पोरेट्स आणि बहुराष्ट्रीय कंपन्या विस्तारीत श्रेणीतील सेवा देतात. यामध्ये संशोधन, धोरणात्मक सल्ला आणि समुपदेशन, भांडवली बाजारपेठा, व्यवहारांचे व्यवस्थापन, प्रकल्प आणि विकास सेवा, एकीकृत सुविधा व्यवस्थापन आणि मालमत्ता आणि संपत्ती व्यवस्थापन अशा सेवांचा समावेश आहे. या सर्व सेवा व्यावसायिक, अधिवासी, औद्योगिक, रिटेल, गोदाम आणि लॉजिस्टिक, हॉस्पिटॅलिटी, आरोग्यसेवा, ज्येष्ठांचे जीवन आणि शिक्षण आदी वर्गांमध्ये दिल्या जातात.

जेएलएल इंडियाने सर्वोत्तम मालमत्ता समुपदेशक म्हणून इंटरनॅशनल प्रॉपर्टी अवॉर्ड्स एशिया पॅसिफिक २०१८-१९मध्ये पंच-तारांकित पुरस्कार स्वीकारले आहेत. `इंडियाज बेस्ट कंपनीज टू वर्क फॉर'– या ग्रेट प्लेस टू वर्क® आणि द इकॉनॉमिक टाइम्सतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या संयुक्त अभ्यासात २०१७ आणि २०१८ अशी सलग दोन वर्षे, भारतातील सर्वोत्तम १०० कामाच्या ठिकाणांमध्ये फर्मचा समावेश झाला आहे. तसेच दहाव्या सीएनबीसी आवाज रियल इस्टेट अवॉर्ड्स २०१५ मध्ये`प्रॉपर्टी कन्सल्टंट ऑफ द डिकेट' म्हणूनही मान्यता मिळालेली आहे. अधिक माहितीसाठी कृपया www.jll.co.in येथे भेट द्या.

अधिक माहितीसाठी कृपया संपर्क

बीनू वाघेला

हेड-पीआर, क्रेडाई-एमसीएचआय

bienumv@gmail.com

राहुल लखपती

पीआर ॲण्ड मिडिया रीलेशन्स, जेएलएल इंडिया

+91 98192 25352

rahul.lakhpati@ap.jll.com

करम सिंग

+91 97117 10553

Karam.singh@mslgroup.com

प्रकृती पाटील

+91 9967941351

Prakruti.patil@mslgroup.com

CREDAI - MCHI
RAIGAD UNIT

JLL